The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109
A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal
Vol 11.Issue1 & 2; Jan-Feb 2024

# रामदास शिष्य वेणास्वामी

**डॉ. वर्षा सिताकांत कीर्तने**
मराठी विभाग प्रमुख,
के. जी. कला व वाणिज्य महाविद्यालय, अहमदनगर.

महाराष्ट्रात वारकरी संप्रदायाची परंपरा शतकानुशतके चालू आहे. रावळातल्या विठोबाला भेटण्यासाठी आषाढी कार्तिकीला हजारो लाखो वारकरी जातात त्यांच्या मुखी हरिनामा बरोबर ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ, तुकाराम या संत मंडळींच्या बरोबरीने मुक्ताबाई, जनाबाई, कान्होपात्रा, सोयराबाई, बहिणाबाई या वारकरी संत स्त्रियांची आठवण होते. त्यांचे अभंग गायले जातात भागवत धर्माचा प्रसार करीत निघालेल्या या दिंडीला सज्जनगड चाफळ होऊन निघालेला मार्तंड तेजाचा दैदीप्यमान समर्थ संप्रदायाचा प्रबळ प्रवाह येऊन मिळाला आहे. गाव शिवेवर बसणाऱ्या भीमरूपी महारुद्राचा हा पंथ आहे. त्यातला एक तेजस्वी, कारुण्य, वैराग्य, पांडित्य आणि परतत्वस्पर्शीत कविता लाभलेली एक विराणी म्हणजे वेणा, वेणास्वामी किंवा स्वामी वेणीराम महाराज होत्या. "उपासनेला दृढ चालवावे । भूदेव संतासी सदा लवावे ॥ सत्कर्म योगे वय घालवावे । सर्व मुखी मंगल बोलावावे ॥" अशी शिकवण देणाऱ्या श्री समर्थांनी खूप मोठे महान कार्य केले आहे. श्री समर्थ संप्रदायात स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीचा मान श्री समर्थांनी दिला. खरंतर लौकिक दृष्टीने वेणास्वामी थोर विदुषी होत्या. समर्थ संप्रदायातील स्त्री संत वेणास्वामींचे स्थान अलौकिक आहे. समर्थांच्या सानिध्यात वेणास्वामी सावलीप्रमाणे राहिल्या आहेत. अत्यंत दृढ निश्चय व संवेदनशील मनाच्या वेण्यास्वामी श्री समर्थ सेवा करून श्री समर्थ स्वरूप झाल्या. श्री समर्थांच्या आज्ञेनुसार श्री समर्थांकडून प्राप्त झालेली अध्यात्मिक विद्येची शिदोरी असंख्य शिष्यांना त्यांनी दिली.

जीवनचरित्र

संत वेणाबाई या समर्थ रामदास स्वामींच्या शिष्या वेणाबाईंची चरित्र विषयक माहिती रामदासी वाङ्मयात इतरत्र पसरलेली आपल्याला आढळते. वेणाबाईंचा जन्म शके १५४९-५० म्हणजे इसवी सन १६२७-२८ रोजी राधिकाबाई व गोपजी पंतांच्या पोटी झाला. गोपजी पंत यांचा लोकसंग्रह मोठा होता. पंचांग सांगणे दुसऱ्यांची पत्रिका लिहून देणे असे कार्य त्यांचे चाले. वेणाबाईंचे वडील गोपजी आणि आजोबा हे दोघेही रामपंथी ते श्रीरामाचे उपासक त्यामुळे लहान वयात त्यांच्यावर संस्कार झाले. थोडक्यात असेही म्हणता येईल की, त्या दोघांनीही श्रीरामाची उपासना मुलीला दिली. संस्कारक्षम अशा बालवयातच ती हे सर्व पहात होती. त्या बालमनात श्रीराम उपासनेची आवड निर्माण झाली. घरात राम भक्तीचे वातावरण होते. त्यामुळे वेणावर आपोआपच रामभक्तीचे संस्कार झाले. वेणा प्रथम स्तोत्र पाठ करत असे आणि त्यानंतर स्तोत्रांचे अर्थ समजावून घेत असे. त्यामुळे रामकथा, कृष्णकथा यामध्ये ती इतकी तल्लीन होऊन जात असे की, जेवण खाण्याचे देखील तिला भान राहत नसे. एवढ्या लहान वयातील तिची अंतर्मुखता आणि अध्ययनशीलता पाहून सर्वजण राधिकाबाई व गोपाजी पंतांचे कौतुक करीत असत. आपल्या मंजुळ स्वरात जेव्हा वेणा रामकथा सांगे तेव्हा आजूबाजूचे शेजार पाजारचे लोक खास तिच्या मंजुळ वाणीतील कथा ऐकण्यासाठी येत असत. त्याकाळात लहान वयातच मुलींची लग्न करून दिली जात त्याप्रमाणे वेणाबाईंचेही चांगले घराणे पाहून लग्न लावून दिले. वेणाबाई इतक्या लहान होत्या की, सासर म्हणजे काय? हेही नीट

समजत नव्हते अशातच त्यांच्यावर संकट कोसळले त्यांना वैधव्य प्राप्त झाले. वयाच्या दहाव्या वर्षी "कपाळावरच्या कुंकवाचा करंडा पालथा झाला. गळ्यातले अलंकार हद्दपार झाले. मनगटासकट कांकण ठेचून निघाले, पण डोक्यावरचे केस? त्यांच्यामुळे यौवनाचे आणि देखणेपणाचे भान असत. सौभाग्यच जिथे नासलं तिथे ती स्त्रीशोभा थोडीच राहू देणार आहे ती लोकरीत? कालपर्यंत जिचं नखही बाहेर समाजाला दिसले नाही तिथे पहाटेच्या चोर उजेडात कोणी परक माणूस ही ऐतिहासिक रूढी पार पाडतं वेणा पूर्ण संन्यासीनी होते. त्याबरोबर अनेक बंध निर्बंधांचे काटेरी पाश तिचं कोवळं आयुष्य करकचून बांधून तिला कायमचा जायबंदी करून टाकतात." हे अंगाला शहारे आणणारे लोकतत्त्व डॉ. मुक्ता कणेकरांनी 'भारतीय संत कवयित्री' या ग्रंथात मांडले आहे. लोकरीती फारच कठीण आणि भयानक होत्या अशा परिस्थितीत त्या डगमगल्या नाहीत. खंबीरपणे उभ्या राहिल्या. कारण त्यांच्या संस्कारक्षम मनाला रामनाम अगोदरपासूनच माहिती होते. राम नामानेच हे बळ तिला मिळाले. एवढ्या लहान वयात वैधव्य प्राप्त होते. त्या काळाच्या रूढी परंपरा अतिशय कठीण होत्या. वेणा विधवा झाली वेणावर झालेला आघात वेणाला अंतर्मुख करून गेला आणि वेणा एकनाथी भागवत, भावार्थ रामायण यामध्ये एकरूप झाली. सुखदु:खाच्या पलीकडे नेणारे हे एक साधन मिळण्यासाठी ठरले पण वाचन करताना अनेक शंका येत काही गोष्टीचा अर्थ काय असेल? असा प्रश्न तिच्या मनात येत असे त्यामुळे आता तिला आवश्यकता होती सद्गुरूंची एक दिवस रामदास स्वामी मिरजेस भिक्षा मागत असताना हिंडत हिंडत वेणाबाईंच्या घरी आले. त्यावेळी वेणाबाई तुळशीच्या कट्ट्यावर 'एकनाथी भागवत' वाचत होत्या. त्याचवेळी 'जय जय रघुवीर समर्थ' ही तेजस्वी वाणी ऐकून त्या चपापल्या रामदास स्वामींनी तुंबाभर दूध मागितले. परंतु वेणाबाईंची सासू म्हणाली, दूध आहे पण ते मारुतीच्या नैवेद्यासाठी ठेवले तेव्हा देता येत नाही. सासूबाईंनी दूध नाही म्हटले म्हणून वेणाबाईंना वाईट वाटले. स्वामींना तसे पाठवू नये म्हणून त्यांनी आपल्या सासूबाईना त्यातील दूध द्यावे अशी विनंती केली. परंतु भिक्षा न मिळताच समर्थ पुढे गेले. त्यांना या गोष्टीची खूप खंत वाटली. काही दिवसांनी समर्थ भिक्षेसाठी वेणाबाईंच्या घरी आले तद्समयी समर्थांची तेजस्वी मूर्ती वेणाबाईंच्या समोर उभी होती. समर्थांनी विचारले, "काय वाचत आहेस बाळा?" वेणाबाईनी शांत चित्ताने उत्तर दिले, 'एकनाथी भागवत' त्यावर समर्थांनी प्रश्न केला, "मुली तुला यातले काही समजते का?' यावर "भक्तिभावाने पोथी वाचावी एवढेच मला ठाऊक, परंतु त्यात काय सांगितले आहे व त्याचे पालन कसे करायचे हे माहीत नाही जे माहिती आहे ते फारच थोडे." याविषयी अडणारे प्रश्न शंका यांचे निरसन करण्यासाठी तिने अतिशय नम्रपणे रामदासांना विनंती केली. तिने पंचवीस प्रश्न विचारले ते प्रश्न पद्यछंदात होते. त्यातील काही उदाहरणार्थ-

नमो वागेश्वररी शारदा सुंदरी । श्रोता प्रश्न करी वक्तयासी ॥
वक्तयासी पुसे जीव हा कवण । शिवाचे लक्षण सांगा स्वामी ॥
सांगा स्वामी आत्मा कैसा तो परमात्मा । बोलिजे अनात्मा तो कवण ॥
कवण प्रपंच कोणी केला संच । मागुता विसंच कोण करी ॥

पुढे -

कवण जाणता कोणाची हे सत्ता । मोक्ष हा तत्वता कोण सांगा ॥
सांगा ब्रह्मखूण सगुण निर्गुण । पंचवीस प्रश्न ऐसे केले ॥

समर्थांना वेणाबाईंनी विचारलेल्या पंचवीस प्रश्नातून तिच्या अभ्यास आणि व्यासंग याची क्षमता ओळखली, म्हणून त्यांनी त्या पंचवीस प्रश्नांची उत्तरे तिने विचारलेल्या अभंग वृत्तात पुढील प्रमाणे दिली आहेत.

नमू वेदमाता नमू त्या अनंता । प्रश्न सांगो आता श्रोतयाचे ॥
श्रोतयाचे प्रश्न जीव हा अज्ञान । जया सर्व ज्ञात तोची शिव ॥
शिवपर आत्मा त्यापर परमात्मा । बोलिजे अनात्मा अनिर्वाच्या ॥
वाच्य हा प्रपंच माईक जाणावा । घडामोडी देवापासुनियां ॥

संत वेणाबाईंच्या आयुष्याला येथून पुढे एक वेगळेच अध्यात्मिक वळण मिळाले. त्यांचा परमार्थाकडे प्रवास सुरू झाला. समर्थांची चांगलीच छाप त्यांच्यावर पडली. परत समर्थांची भेट कधी होईल असा ध्यास तिला लागला. 'जय जय रघुवीर समर्थ' हे शब्द सतत कानात घुमू लागले समर्थांनी चार उपदेशाची वाक्य ऐकवली त्या वाक्यांच्या उपदेशाने वेणाबाईंच्या मनावर संस्कार झाला. समर्थ हेच आपले गुरु आणि हेच आपल्याला परमार्थाचा योग्य मार्ग दाखवतील अशी तिची भावना झाली. आधीच्या अभ्यासाने जिज्ञासा अधिक प्रखर झाली, अधिक काही मिळावे यासाठी ज्ञानसंपन्न अशा त्याच अधिकारी पुरुषाचा अनुग्रह घ्यावा ही इच्छा प्रबळ झाली.

समर्थांकडून मंत्रोपदेश

समर्थ रामदास आणि वेणाबाई यांची भेट मिरजेत झाली. त्यावेळी प्रश्नोत्तर स्वरूपात त्या दोघांचे थोडेसे संभाषण झाले. त्यांच्या भेटीने वेणाबाई भारावून गेली तिला समर्थ भेटीची आत्यन्तिक उत्कंठा लागली. त्या काळातच वेणाबाईंच्या सासूबाईंचे निधन झाले. कदाचित या कारणामुळे वेणाबाई आपल्या आई-वडिलांकडे कोल्हापूरास परत आली. परंतु वेणाबाईंचे भाग्य थोर समर्थ देखील आपल्या शिष्य समुदायांबरोबर कोल्हापुरात आलेले होते. कोल्हापुरात समर्थांचे कीर्तन असे वेणाबाई कीर्तनाला नियमाने रोज जात. वेणाला एकच ध्यास लागला अशक्य ते शक्य व्हावे आणि आपल्याला समर्थांचा अनुग्रह मिळावा. समर्थ संप्रदायाची दीक्षा मिळावी आणि आश्चर्य खरोखरच तसे झाले. मनापासून प्रार्थना करणाऱ्या वेणाच्या मनासारखे घडले एके दिवशी तिने समर्थांच्या पायांवर डोके ठेवून आपणास अनुग्रह द्यावा अशी विनंती केली. ती मान्य करून समर्थांनी वेणाबाईंना राममंत्रोपदेश दिला.

आयुष्याचा उत्तररंग

वेणाबाईंच्या पूर्व आयुष्यापेक्षा त्यांचे उत्तरायुष्य उठून दिसते. त्यांचा प्रवास आता संतपदाकडे चालला होता. महत्त्वाचे प्रसंग, बदल त्यांच्या आयुष्याच्या उत्तररंगात घडून आले. म्हणूनच महत्त्वाचा मोक्षपर्व समर्थांच्या सानिध्यात आल्यापासून एकदमच बदलून गेला. रामदास स्वामी वेणाबाईंना मुलगी मानत असत. वेणाबाईंना संत रामदासांमुळेच पुनर्जन्म लाभला होता. वेणाबाई आपल्या पूर्व आयुष्याविषयी सर्व विसरून जाऊन समर्थांच्या अध्यात्मिक प्रपंचात स्वतःला नीट जुळवून घेतले. गुरूपदेश व अनुग्रह घेतल्यावर समर्थांच्या मठात राहून त्या कीर्तन, श्रवण, अध्ययन करू लागल्या. वेणाबाईंनी एखाद्या मठाचे महंतपद स्वीकारावे असे समर्थांना वाटे. परंतु वेणाबाईंनी ते स्वीकारले नाही, कारण आपल्याला समर्थांची सेवा करता येणार नाही व सहवास मिळणार नाही म्हणून वेणाबाई इतरत्र कोठेही गेल्या नाहीत. शेवटपर्यंत त्या तेथेच होत्या. मठाच्या व्यवस्थेच्या किरकोळ चार कामांची जबाबदारी त्यांच्यावर सोपवून समर्थ आपल्या कन्येला विद्यार्थिनीच्या शिस्तीत अधिकाधिक शिक्षणाचे धडे देऊ लागले. वेणाबाईंच्या प्रयत्नातून हळूहळू वक्तृत्व तयार होऊ लागले. त्यांची रामभक्ती त्यांच्या पदावरून जशी लक्षात येते; तशीच त्यांच्या भावस्थितीची कल्पना येते. समर्थांच्या अनेक शिष्यिनी होत्या. त्यात वेणाबाईंना सर्वांसमोर सभेमध्ये उभे

राहून कीर्तन करण्याची समर्थ रामदासांची आज्ञा होती. याचा उल्लेख गिरीधरकृत 'समर्थ प्रताप' या ग्रंथात (अ. २० ओ. २१) आला आहे.

गिरीधर स्वामींनी 'समर्थ प्रताप' या ग्रंथात अनेक प्रसंगाचे वर्णन केले आहे. वेणाबाईंवर समर्थांच्या जेवणाची व्यवस्था करण्याची महत्त्वाची जबाबदारी होती. समर्थ परळीच्या किल्ल्यावर असताना त्यांचा असा कडक नियम होता की, समर्थांचा स्वयंपाक करावा व त्यांचे ताट वाढून ते एका खोलीत ठेवावे. त्यानंतर समर्थ तेथे येऊन निवांत एकटे जेवण करीत असत. त्या खोलीत कुणीही जायचे नाही किंवा साधे डोकवायचे देखील नाही. अशी त्यांची सक्त ताकीद होती. खोलीचे दार लोटलेले असे. त्यांच्या आज्ञेचे सर्वजण पालन करीत असे एके दिवशी वेणाबाईनी ताट व्यवस्थित वाढून खोलीत नेऊन ठेवले व स्वयंपाक घरात आल्या काही वेळ निघून गेला त्यानंतर त्यांच्या असे लक्षात आले की, ताटात एक पदार्थ वाढायचा राहून गेला. हे लक्षात येताच लगबगिने तो पदार्थ वाढण्यासाठी गेल्या समर्थांच्या खोलीचे दार वेणाबाईंनी थोडेसे उघडले त्यावेळी त्यांनी असे पाहिले की, समर्थ एका विशाल मारुतीसह भोजन करत होते. ते दृश्य पाहून वेणाबाई बेशुद्ध पडल्या नंतर ज्यावेळी समर्थ बाहेर आले त्यावेळी त्यांना सर्व हकीगत समजली संत वेणाबाईंच्या अंगावर समर्थांनी हात फिरवला व त्यांना सावध केले.

वेणाबाईंच्या उत्तरायुष्यात दोन महत्त्वाच्या घटना घडल्या पहिली घटना म्हणजे समर्थांनी मिरजेत स्वतंत्र मठ स्थापला. शके १५७८, दुर्मुखनाम संवत्सरे, श्रावण वद्य पक्षात आणि तेथे महंत म्हणून वेणाबाईंची नेमणूक केली. वेणाबाई ज्या काळात वावरत होत्या त्याकाळी विधवा स्त्रीच तोंड पाहणे देखील निषिध्द मानत होते. त्या काळात समर्थांनी मठाचे महंतपद व कीर्तनाची आज्ञा देणे ही एक क्रांतिकारक घटना आहे. रूढी, परंपरेविरुद्ध समर्थांनी बंड केले जेथून वैधव्याची अपमानित दिंड काढली गेली तेथेच मठाधिपती म्हणून 'महंतीण' हे पद देऊन सन्मानित केले हे भाग्यच.

आयुष्याच्या उत्तररंगात दुसरी उठून दिसणारी महत्त्वाची घटना संत वेणाबाई ग्रंथकार झाल्या मिरजेच्या मठात त्यांचे काव्य बहराला आले बरीच काव्यरचना केली मिरजेच्या मठात त्यांनी आपला शिष्य संप्रदाय वाढविला. तसेच नवीन साधकांना अनुग्रह दिला व संप्रदायाची दीक्षा दिली यावरून वेणाबाईंच्या अधिकाराची कल्पना येते. जो अधिकार प्राप्त झाला तो केवळ समर्थ रामदासांच्या कृपाशीर्वादानेच त्यांचा पुनर्जन्म झाला. जीवन चौअंगी फुलले त्यांच्या आयुष्यातील झळाळणारा अध्याय म्हणजे त्यांचे इच्छामरण. वेणाबाईंनी समर्थांजवळ आपली मरणाची इच्छा बोलून दाखवली एकदा आपण सदेह वैकुंठात जाऊन यावे व वर्तमान पहावे हा विचार तिने समर्थांना सांगताच समर्थांनी ताबडतोब ओळखले की, हीचा मृत्यू काळ जवळ आला आहे. समर्थांनी वेणाबाईंना सीतास्वयंवर या तिच्याच ग्रंथावर कीर्तन करण्यास सांगितले. समर्थांच्या आज्ञा लक्षात घेऊन त्यांनी कीर्तनाची तयारी केली. वेणाच्या कीर्तनाला खूप गर्दी झाली. कीर्तन चालू असतानाच रामदासांनी शिष्यास प्रेतदहनाचे सर्व साहित्य तयार ठेवण्यास सांगितले. त्या शिष्याना प्रश्न पडला की, कोणीच मेले नाही तरी हे कशाला साहित्य आणाव्यात सांगतात? शिष्य बुचकाळ्यात पडलेले असतानाच वेणाबाईंचे कीर्तन संपून आरती होताच ती समर्थांच्या जवळ गेली व आपली वीणा त्यांच्याजवळ दिली. पायावर डोके ठेवून वेणाबाईंनी तेथेच प्राण सोडला. प्रतिवर्षीप्रमाणे रामनवमीच्या उत्सवासाठी सज्जनगडावर येणाऱ्या वेणाबाई परत मिरजेच्या मठात गेल्याच नाहीत. समर्थांच्या जवळ मरण मिळावे ही त्यांची इच्छा पूर्ण झाली. समर्थांनी स्वतःच्या हाताने वेणाला चंदनकाष्ठी ठेवून अग्नी दिला. त्यांनी समर्थ चरण शेवटपर्यंत सोडले नाही.

काव्यसंपदा

संत वेणाबाईंनी रचलेली काव्य अतिशय साधी सरळ आहेत. त्यांना भागवत, रामायण इत्यादी ग्रंथ चांगले अवगत होते. पूर्वकाली होऊन गेलेल्या साधुसंतांच्या ग्रंथांचाही त्यांनी अभ्यास केला होता. हे त्यांच्या वाङ्मयातून लक्षात येते वेणाबाईंना वेणास्वामी म्हणूनही उल्लेखले जाते. 'सीतास्वयंवर' हा अत्यंत सुंदर असा ग्रंथ आहे. त्यात वेणाबाईचे काव्यकौशल्य आणि भाषाप्रभुत्व उठावदार रीतीने व्यक्त झाले आहे. स्वयंवर आख्यान महाभारतातील रुक्मिणीची असो किंवा रामायणातील सीतेचे वेणाबाईंचे 'सीतास्वयंवर' हे काव्य ओवीबद्ध आहे. 'सीतास्वयंवरा'त वेणाबाईंनी सामासांची योजना केलेली दिसते. यात १४ समास असून ओवी संख्या १५६८ आहे. ग्रंथाच्या शेवटी एकंदर ओवी संख्या किती याची नोंद आहे. समर्थांनी वेणाबाईंच्या 'सीतास्वयंवर' या काव्यग्रंथावरच कीर्तन करण्यास सांगितले त्यांच्या सांगण्यावरूनच वेणाबाईंनी आपल्याच या काव्यावर शेवटचे कीर्तन केले. लोकपरंपरेला धरून ग्रंथाच्या सुरुवातीला त्या गजाननाला प्रथम वंदन करतात. त्यानंतर वेदमातेला वाग्देवतेला व कुलदैवतांना नमस्कार करून काव्याची सुरुवात केली आहे. उदा.

ऐसा पूजीला गणपती । आणि नमिला यथामती ॥
हेत धरूनिया चिंती । रघुनाथकथेचा ॥४॥
आता वंदू वेदमाता । जे कार्यकर्ती सर्वसत्ता ॥
जियेच्या कृपेकरिता । पुष्टी चढे वळे ॥५॥
पुढे त्या रामाचे गुणवर्णन करतात त्यानंतर श्रोत्यांना -
आता श्रोती निरोत्तर । नावेक होवो जी तत्पर ।
मंगळोत्छाह सैवर । ऐका जानकीचें ॥१५॥

'सीतास्वयंवर' या काव्यात विश्वमित्र आयोध्या नगरीत येतात व दशरथ राजाकडे येऊन त्यांनी आपण यज्ञ करणार आहोत त्याच्या रक्षणार्थ राम-लक्षणास पाठवावे अशी विनंती करतात. त्यानंतर होणारी माता पिता यांची अवस्था याचे वर्णन तसेच विवाह प्रसंगीचे सर्व वर्णन, पदार्थांचे वर्णन, अलंकारांचे वर्णन, रुखवत तेलवानाची वर्णन, गौरीहराचे वर्णन, हळदीचे वर्णन, वरपूजन, सीतापूजन, राम जानकी विवाह वर्णन, मंगलाष्टके, गृहप्रवेश या सर्वांचे वर्णन सुंदर केले आहे जणू काही हा विवाह सोहळा आपण अनुभवत आहेत असेच वाटते.

समर्थशिष्य वेणाबाई आणि त्यांच्या संप्रदायाचे कुलदैवत श्रीराम आहे. वेणाबाईंचे 'सीतास्वयंवर' काव्य रामायणाशी निगडित आहे. त्याचप्रमाणे 'रामायण', 'रामगुहकसंवाद', 'कौल' ही काव्य रामायणातील घटनांवर व प्रसंगांवर आधारित आहेत. म्हणून वेणाबाईंचा विचार करता असे लक्षात येते की, वेणाबाईंच्या विशाल काव्याचा मापदंड आहे एकमेव श्रीराम

समारोप

मध्ययुगीन मराठी महिलांमध्ये वेणाबाईंचे स्थान अनेक दृष्टीने वरचे आहे. समर्थांच्या अनेक शिष्यनींपैकी संत वेणाबाईंचा अधिकार मोठा होता. त्या पहिल्या कर्तृत्वशील महिला, पहिल्या महिला कीर्तनकार तसेच पहिल्या महिला ग्रंथकाराचा मानही मिळवतात. मध्ययुगीन स्त्रीसंत कवयित्रींनी फक्त अभंग रचना केली. परंतु वेणाबाईंनी ग्रंथाची रचना केली. त्यामुळे त्या पहिल्या ग्रंथकार ठरतात तसेच त्यांनी काही पदरचना देखील केली आहे. संत वेणाबाई बालविधवा होत्या. त्याकाळी विधवेला मिळणारी वागणूक होणारा त्रास असे असूनही समर्थांच्या शिष्यत्वामुळे त्या जीवनात आलेल्या अनेक संकटांना झेलत

त्यांच्यावर मात करत श्रीसमर्थांच्या नित्य सहवासात राहून मार्गक्रमण त्यांनी चालूच ठेवला. मिरजेच्या मठाधिपती झाल्या वेणास्वामींनी 'सीतास्वयंवर', 'रामायण' 'रामगुहकसंवाद' उर्फ नावेचे श्लोक 'कौल', पदरचना यासारखे वांग्मय निर्माण केले. याबरोबर त्यांची काही स्फूटप्रकरणे असावीत असेही मानतात. वेणाबाईंचे 'पंचीकरण' हे एक छोटे वेदांत विषयावरील गद्यात्मक प्रकरण आहे. संत वेणाबाईनी कथाकाव्य, स्फुटरचना अशी निर्मिती अंत्यत भक्तिभावाने केली आहे. त्यांचे एकूणच काव्य विविध काव्यगुणांनी नटलेले आहे. प्रवाही व प्रभावी निवेदनशैली, साधी-सुलभ भाषा आणि अलंकारांची स्वाभाविक योजना, भक्त-वत्सल भावांचा परिपोष आणि नाद मधुर रचना असे काही विशेष त्यांच्या रचनांचे सांगता येतात.

संत वेणाबाईंच्या काव्यातून तत्कालीन समाजजीवनाचे संस्कृतीचे काही विशेषही चित्रित झाले आहेत. त्याच्या काही रचना ब्रम्ह सुष्टीचे स्पष्टीकरण करतात. विचार व कल्पना सौंदर्याची अनेक स्थळे त्यांच्या काव्यात पाहावयास मिळतात. मराठी संत कवयित्रींच्या काव्यात संत वेणाबाईंच्या काव्याला एक आगळेवेगळे स्थान प्राप्त झाले आहे. संत वेणाबाईंच्या काव्यातून तत्कालीन समाजजीवनाचे संस्कृतीचे काही विशेषही चित्रित झाले आहेत. त्याच्या काही रचना ब्रम्ह सुष्टीचे स्पष्टीकरण करतात. विचार व कल्पना सौंदर्याची अनेक स्थळे त्यांच्या काव्यात पाहावयास मिळतात. मराठी संत कवयित्रींच्या काव्यात संत वेणाबाईंच्या काव्याला एक आगळेवेगळे स्थान प्राप्त झाले आहे.

संदर्भ ग्रंथ

१)संपा. कदम ना. रा., पोटे देविदास, भारतीय संत कवियत्री, प्रथम आवृत्ती, भारतीय सेवक संघ, मुंबई, २००१

२)अजगावकर ज. र., महाराष्ट्र संत कवयित्री, प्रथम आवृत्ती, भारत गौरव ग्रंथमाला, मुंबई, १९३९

३)प्रका. सत्कारयोजक सभा, धुळे, श्रीरामदास आणि रामदासी, भाग बारावा, श्रीसीतास्वयंवर (विणाकृत) विजयादशमी, शके १८३५.